**सीएनआर नं.– एमएचएलसी ३६०००००७५२०१९**

## रमेश बोम्बार्डे –विरुध्द– मेसर्स ऐलोरा पेपर मिल व इतर
## निशाणी क्र. सी.–१५ वरील आदेश

गैरअर्जदार क्र. २ ने प्रस्तुतचा अर्ज हा निशाणी क्र. यु.–१२ वर दिनांक ०५.०८.२०२३ रोजी उलट तपास नाही असा झालेला आदेश रद्द करुन उलट तपास घेण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. सदरील अर्जावर विरुध्द पक्षकाराचे म्हणणे मागविण्यात आले. अर्जदारातर्फे सदरील अर्जावर म्हणणे दाखल करुन तो नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. दोन्ही विद्यीज्ञांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराविरुध्द श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ च्या कलम २२ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याकरिता दाखल केला आहे. अर्जदाराने सरतपासाचा पुरावा दिनांक ०४.०२.२०२२ रोजी दाखल केला परंतु गैरअर्जदार क्र. २ ने त्याचा उलट तपास न घेतल्यामुळे उलट तपास नाही असा आदेश निशाणी क्र. यु.–१२ वर दिनांक ०५.०८.२०२३ रोजी पारित करण्यात आला. त्यानंतर दिनांक ३०.१०.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र. २ ने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराचा मुळ अर्ज पाहता ते श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ च्या कलम २२ अंतर्गत नुकसान भरपाई

LABOUR COURT

मिळण्याकरिता दाखल केल्याचे दिसते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. २ ने अर्जदाराचा उलट तपास न घेतल्यास त्याचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ यांच्यातील वादाचे मुळ कारण निकाली काढण्याकरिता गैरअर्जदार क्र. २ ला अर्जदाराचा उलट तपास घेण्याची संधी देणे गरजेचे वाटते. असे असले तरी झालेला विलंब दुर्लक्षित करुन चालणार नाही म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आ दे श**

१. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. २ नी अर्जाचा खर्च म्हणुन अर्जदारास याला रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे फक्त) दयावेत.

भंडारा. ( एफ.के. शेख )
दिनांक : ०२/०२/२०२४. न्यायाधिश,
कामगार न्यायालय, भंडारा.

LABOUR COURT